# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ०३/१२/२०२५ (बुधवार )

---

### अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे तसेच दारू बाळगुण विक्री,वाहतुक तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद.

दिनांक ०२/१२/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा **एकुण ४२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण १ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन रामटेक येथे एकुण २ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन केळवद येथे एकुण २ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ७७४० मिली देशी दारू, ०३ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ४२८०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

# अस्तित्व लपवुन गुन्हा करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन काटोल:—** दिनांक ०२/१२/२०२५ रोजी काटोल पोलीस अवैध धंदयावर कारवाई करणेकामी पेट्रोलींग करीत असता मौजा गळपुरा चौक काटोल परिसरात आरोपी नामे भुषण प्रकाश रगतपुरे, वय २५ वर्ष, रा. लोहारी सावंगा ता. नरखेड हा सुर्यास्तानंतर आणि सुर्योदयाच्या पुर्वी फिरतांना मिळुन आला. पोलीसांनी त्याला विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली. नमुद हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने वावरतांना मिळुन आल्याने आरोपीचे विरूध्द कलम १२२ महाराष्ट्र पोलीस अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**